**जिल्हा व सत्र न्यायालय, सातारा.**
**सेशन पोलीस प्रॉसिक्युशन स्क्वॉड, सातारा.**
**( साक्षीदार अभ्यागत कक्ष )**

---

**प्रेस नोट   दिनांक -३१/०३/२०२६**

## आरोपीने पिडीतेवर बलात्कार केल्याप्रकरणी जन्मठेप व रु.२०,०००/- दंडाची शिक्षा.

**सातारा** - दि.२१/०३/२०२२ रोजी पहाटे ०४.१५ वा.चे सुमारास यातील आरोपी नामे **संकेत स्वरुप गुजर वय-२५ वर्षे रा.३३४ रामाचा गोट मंगळवार पेठ,सातारा ता.जि.सातारा हल्ली रा.प्लॅट नं.१ निरंकार अपार्टमेंट तिसरा मजला समर्थ कॉलनी शाहुपुरी सातारा ता.जि.सातारा** याने कपडयाचे रूपसमीर दुकानाचे समोर झोपलेल्या पारधी समाजातील महिला यांचेजवळ जावून त्यांना ५००/- रू देतो चल असे म्हणाला होता. व नंतर तेथुन तो त्याचे मोटार सायकलवरुन पोष्ट ऑफिस समोरुन सातारा पंचायत समिती साताराचे समोर असलेल्या फोडजाई मंदिरासमोरील मोकळ्या जागेतुन पिडीता वय ०४ वर्षे हिस आरोपी याने तिचे पालकांचे कायदेशीर रखवालीतुन तिचे तोंड दाबुन तिला उचलुन घेवुन त्याचे डिओ मोपेड मोटार सायकल क्र.MH-१२.एम.एक्स-०५९१ यावरुन बॉम्बे रेस्टॉरंट चौक मार्गे पुणे ते बेंगलोर जाणारे राष्ट्रीय महामार्गावरुन, खिंडवाडी गावचे अलीकडे सर्व्हिस रोडने खिंडवाडी बोगद्यातुन खिंडवाडी ते सोनगाव जाणारे रस्त्याने पुढे सातारा पॉलिटेक्निकचे उत्तरेस गाडेखडीचे नाकाडे नावचे डोंगराचे अलीकडे जांभळाचे झ ाडाखाली जमिन गट नं.१५१ मध्ये घेवुन जावुन, त्यास तो गुजराती जातीचा असुन पिडिता हि पारधी जातीची आहे हे माहित असतानाही त्याने तिला पळवुन नेहुन तिला मारहाण करुन तिचेवर जबरी संभोग केला आहे. व तिला नंतर तेथेच सोडुन तेथुन पळुन गेला. म्हणुन वगैरे मजकुरची फिर्यादवरुन पोलीस स्टेशनला गुन्हा रजि.दाखल करण्यात आलेला आहे.

**सदर गुन्हयाचा तपास करुन तत्कालीन १) श्रीमती आँचल दलाल सहा.पोलीस अधीक्षक उपविभागीय पोलीस अधिकारी सातारा विभाग, सातारा २) तत्कालीन तपासी अधीकारी श्री. विश्वजित घोडके पोलीस निरीक्षक सातारा तालुका पोलीस ठाणे** यांनी मा.न्यायालयात सदर गुन्हयाचे दोषारोप पत्र पाठवण्यात आले होते.

सदरचा खटला **मा. श्रीमती सानिका जोशी सो, जिल्हा व सत्र न्यायाधीश (DJ-३) सातारा** यांचे कोर्टात चालला होता. **सरकारतर्फे श्रीमती ज्योती दिवाकर अतिरिक्त जिल्हा सरकारी वकील, सातारा** यांनी खटल्याचे कामकाज पाहिले. नमुद केसमध्ये एकुण **२३ साक्षीदार** तपासले. परिस्थितीजन्य पुरावा तसेच अन्य साक्षीदारांचे साक्षीवरून व जिल्हा सरकारी वकील यांचा युक्तीवाद व आरोपीने केलेल्या कृत्याबाबत मा.उच्च न्यायालय,सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिवाडे यांचे दाखले न्यायालयात सादर केलेने समोर आलेला पुरावा ग्राहय मानुन मा.न्यायाधीश **श्रीमती सानिका जोशी सो, जिल्हा व सत्र न्यायाधीश (DJ-३) सातारा** यांनी आज **दि.३१/०३/२०२६ रोजी यातील आरोपी यास भा.द.वि.स.क.३७६(A)(B) सह बाल लैंगिक अत्याचार कायदा कलम ५(i)(m)(r), ६ अन्वये दोषी ठरवुन जन्मठेपेची शिक्षा व रु.२०,०००/-दंड, दंड न भरलेस ०३ महिने साधा कारावासाची शिक्षा सुनावली आहे. (सदर दंडा पैकी रु.१५,०००/- दंड यातील पिडीता हिस देण्यात यावी.)**

**मा. श्री. तुषार दोशी पोलीस अधीक्षक सातारा, मा. डॉ. वैशाली कडुकर अपर पोलीस अधीक्षक सातारा, श्री.राजीव नवले उपविभागीय पोलीस अधिकारी सातारा विभाग सातारा व श्री. निलेश तांबे पोलीस निरीक्षक सातारा तालुका पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली पैरवी अधिकारी म्हणुन शितल भोसले म.पो.हवा.ब.नं.१९०० व तेजा तुपे म.पो.हवा.ब.नं.१३६९ सातारा तालुका पोलीस स्टेशन यांनी कामकाज पाहिले.**

**पोलीस अधीक्षक सातारा करीता.**